
२०/१/२५

# लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी सिद्ध केलेले संविधान!

**चाहूल**

**विबुधप्रिया दास**

**'सिव्हिल सोसायटी'** किंवा 'नागरी समाज' हा शब्द २०११ च्या 'अण्णा आंदोलना'पासून प्रचारात आला, त्याहीआधी 'स्टेट अ‍ॅण्ड सिव्हिल सोसायटी इन इंडिया' (१९९५) हे पुस्तक लिहिणाऱ्या नीरा चंधोक! त्यांचे 'वुई, द पीपल अ‍ॅण्ड अवर कॉन्स्टिट्यूशन' हे ताजे पुस्तक भारतीय राज्यघटनेत- म्हणजेच गेली ७५ वर्षे टिकलेल्या संविधानात 'लोकां'ना कळीचे स्थान आहे ते का आणि कसे, याची चर्चा करते. पुस्तक अवघ्या १६० पानांचे- पण मजकुराने, तपशिलाने भरपूर. अशा भरगच्च मजकुराच्या पुस्तकांमध्ये धोका असतो तो जंत्रीवजा तपशिलांचा. म्हणजे विचारांपेक्षा केवळ माहितीच अधिक असल्याचा. हे पुस्तक तसे नाही. म्हणून ते खास.




चंधोक यांच्या अभ्यासूपणाचा आणि चिंतनाचा, त्या दिल्ली विद्यापीठात अध्यापन करत होत्या तेव्हा विद्यार्थ्यांनीही त्यांना संविधानाबद्दल विचारल्या असतील अशा शंकांना चंधोक यांनी दिलेल्या उत्तरांचा अनुभव या पुस्तकातून मिळतो. 'लोकशाही हा अविरत चालणारा, न थांबणारा प्रकल्प आहे' याची जाणीव विषयप्रवेश करतानाच त्या देतात. संविधान वसाहतवादी आहे, असा अपप्रचार आज होत आहे त्याला उत्तरही या पुस्तकातून मिळते. १८९५ मध्ये 'स्वराज्या'च्या मागणीला धार चढली, तेव्हापासून ते १९४६ पर्यंत भारतीय नेत्यांनी वसाहतवादी ब्रिटिशांशी मुद्देसूद भांडून संविधान कसे मिळवले, याची हकिकत चंधोक सांगतात. त्यात अर्थातच १९१९ व १९३५ चे कायदे, नेहरू अहवाल आदी तपशील येतात पण पाश्चात्त्यांची (पर्यायाने वसाहतवाद्यांची) 'लोकशाही'ची- मतदानाच्या हक्काची- कल्पना तुटक आणि मर्यादित

मतदानाचा समान हक्क द्या असे म्हणत होते, त्यामागे मानवी समानतेचा मूलभूत विचार हा बुद्धांपासूनचा होता याचीही जाणीव त्या देतात. पाच हजार वर्षांपासूनची भारतीय संस्कृती आपल्यामागे आहे आणि ती कीर्ती राखतानाच आपण आता इथून पुढे जायचे आहे, अशा आशयाचे पं. नेहरूंनी संविधानसभेत केलेले भाषण त्या नमूद करतात. ही संस्कृती कुणा एकाच धर्मावर आधारलेली नाही, यावरही कसे एकमत होत गेले हे या पुस्तकातून दूरान्वयाने उमगते. उदाहरणार्थ, राज्यघटनेचा मसुदा तयार होत असताना, धर्मवार राखीव मतदारसंघ असावेत का यावर चर्चा झाली होती- पण अशी विभागणी आपण टाळली, हे चंधोक आवर्जून नोंदवतात. पुढल्या एका प्रकरणात (याचे नाव 'द डिस्क्रीट चार्म्स ऑफ सेक्युलॅरिझम' असे आहे) 'रमेश प्रभू निकाला'चा संदर्भही त्या घेतात. शिवसेनेच्या उमेदवारास धर्माच्या नावावर मते मागितली म्हणून बाद ठरवले आणि त्याच कारणासाठी निवडणूक आयोगाकडून शिवसेनाप्रमुखांचा मतदानाचा हक्क सहा वर्षांसाठी खंडित करण्यात आला होता, ती निवडणूक १९८७ सालची. खासदारकीस प्रभू मुकल्याचे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले, तेव्हा न्या. जगदीशशरण वर्मा यांनी हिंदू 'धर्मा'च्या नावावर मते मागणे चूकच असा निकाल दिलेला असला तरी तो निःसंदिग्ध नव्हता... कारण याच निकालात, हिंदू जीवनपद्धतीला आवाहन करून मते मागणे गैर नाही, अशी संदिग्धताही आहे, हे चंधोक नमूद करतात. चंधोक यांचे मत, सेक्युलॅरिझम म्हणजे कोणत्याही धर्माच्या कोणत्याही प्रकारच्या संप्रदायवादाला/ जातीयवादाला - म्हणजे धर्माच्या राजकीय वापराला- विरोध करण्याकडे झुकणारे आहे.

पण म्हणून काही हे पुस्तक केवळ त्या मताच्या प्रसारासाठी लिहिलेले नाही. पुस्तकात आणखीही काही आहे, जे केवळ राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनाच असलेल्या कोणाही - देशी किंवा परदेशी- माणसांसाठी उपयुक्त ठरणारे आहे. राज्यशास्त्राच्या सिद्धान्तांमध्ये 'सामाजिक करार सिद्धान्त' महत्त्वाचा मानला जातो. चंधोक यांनी या पुस्तकात, भारतीय संविधान हा भारतासाठी नवा सामाजिक करारच कसा आहे, याची चर्चा करताना हा सिद्धान्त मांडणाऱ्या थॉमस हॉब्जपेक्षा तो पुढे नेणाऱ्या जॉन लॉकच्या सिद्धान्ताचा आशय लक्षात घ्यावा लागेल, असे नमूद केले आहे. हॉब्जच्या मते माणूस जात्याच नाठाळ, त्याला वठणीवर ठेवण्यासाठी सरकार हवेच. तर लॉकच्या मते माणसे चांगली असतात, पण सरकार अवघ्या समाजाच्या भलाईसाठी हवे. लॉकनंतर सैद्धान्तिकदृष्ट्या विकसित झालेल्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा थेट उल्लेख संविधानात नसला तरी 'सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय' या मूल्याप्रमाणे वागणाऱ्या राज्ययंत्रणेने कल्याणकारी असायलाच हवे! या 'न्याया'संदर्भात नंतरच्या प्रकरणांमध्ये 'यूपीए'च्या २००४ ते २०१४ काळात रोजगार, अन्नसुरक्षा , शिक्षण यांना 'हक्क' म्हणून मान्य करण्याची पावले कशी उचलली गेली याचे वर्णन आहे आणि 'मनरेगा'सारखी योजना सरकार बदलले तरीही बंद झालेली नाही, याबद्दल समाधानही व्यक्त करतात. चंधोक या यूपीएसमर्थक असल्याचा निष्कर्ष यातून काढता येईल, पण 'आर्थिक न्याय' या संकल्पनेची चर्चाच संविधानाच्या संदर्भात फारशी होत नाही- ती सुरू केल्याचे श्रेय चंधोक यांना द्यावे लागेल. विशेषतः दर वर्षीच्या दावोस अर्थमंचाच्या वेळी 'ऑक्सफॅम' संघटना जगभरात आर्थिक विषमता कशी वाढते आहे, गरीब आणखीच गरीब होत आहेत याचा जो अहवाल देते, त्यामागचे वास्तव लक्षात घेतल्यास 'आर्थिक न्याया'ची चर्चा यापुढे तरी महत्त्वाची ठरली पाहिजे.

संविधानाचे राखणदार म्हणून न्यायपालिकेकडे- सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांकडे- पाहिले जाते. या पुस्तकात सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निवाड्यांचा उल्लेख येतो, पण तरीही हे काही कायद्याचे पुस्तक नाही. संविधानातल्या लोक-केंद्री संकल्पना सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांमुळे कशा उन्नत होत गेल्या, हे सांगण्याच्या ओघात हे उल्लेख येतात. उदाहरणार्थ, मनरेगातून सुनिश्चित झालेला 'रोजगाराचा हक्क' हा मुळात जीवन जगण्याच्या पातळीवर. प्रत्यक्षात संविधानात सुधारणा (८६ वी घटनादुरुस्ती, १२ डिसेंबर २००२) करून, जगण्याच्या हक्काचे पोटकलम म्हणून चौदाव्या वर्षीपर्यंत शिक्षणाचा हक्क समाविष्टही करण्यात आलेला आहे. मुळातला जगण्याचा हक्क (अनुच्छेद २१) हा कायदेशीर कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज 'कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवन किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही' असा आहे. पण व्यक्तिगत स्वातंत्र्य म्हणजे काय, याची व्याप्ती सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांमुळे वाढली, त्याचमुळे खासगीपणा, लिंगभाव जपणे, हेही हक्क मानले गेले. ही वाटचाल चंधोक यांना स्वागतार्ह वाटते.

चंधोक यांचा खरा भर आहे तो लोककेंद्रीपणावर. देशोदेशींच्या लोकचळवळींचा अभ्यासही चंधोक यांनी यापूर्वी केलेला आहे, त्या संदर्भात 'संविधान लागू झाले, आता आंदोलने करण्याची गरज नाही... सरकारकडून जे हवे, ते मिळवण्यासाठी लोकांहाती आता संविधान आहे' असा प्रचंड आशावाद व्यक्त केला जातो, त्याचाही समाचार त्या घेतात. नागरी लोकसमूहाची राजकीय अभिव्यक्ती ही आंदोलनांमधून होते आणि त्यातून राजकीय/ धोरणात्मक बदलही घडतात हा मुद्दा मांडण्यासाठी त्या अनेक आंदोलनांचा ऊहापोह करतात. यात अगदी 'नागरिकत्व दुरुस्ती कायदाविरोधी आंदोलन' आणि 'शेतकरी आंदोलन'देखील आहे आणि या आंदोलनांना संविधानातूनच बळ कसे मिळाले, या आंदोलनांचा आधार सांविधानिक कसा होता, याची चर्चा त्या करतात.

तरुण-तरुणी भारताच्या राजकारणात आज इतका टोकाचा विरोधाभास का दिसतो म्हणून व्यथित झाले असतील, उद्विग्न मनःस्थितीत असतील. त्यांना चंधोक जणू समजावतात : विरोधातूनच राजकारण उभे राहाते, परंतु राजकारण कसे करायचे याला काहीएक दिशा हवी, ती दिशा आपल्याला आपले संविधान देते. 'लोक' ही काही काल्पनिक संकल्पना नव्हे. विवेकबुद्धीचा सामूहिक वापर लोकशाहीत वारंवार करावाच लागतो, याची आठवण देण्याचे काम हे पुस्तक करते. यंदाच्या प्रजासत्ताकदिनी ही आठवण देणारे हे सर्वांत अलीकडचे पुस्तक म्हणावे लागेल. 'स्पीकिंग टायगर' प्रकाशनगृहाने २०२४ सालीच प्रकाशित केलेल्या या पुस्तकाची किंमत

Scanned with OKEN Scanner

# मरणात जगणारी माणसे...

**बनारसच्या घाटांवरील स्मशानांत राहणाऱ्या डोम किंवा डोंब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, सदैव दुर्लक्षित राहिलेल्या समाजाचे जळजळीत वास्तव मांडणारे हे पुस्तक, या समाजाच्या सद्यःस्थितीमागची राजकीय कारणे मांडणे का टाळते, हे मात्र कळत नाही...**

अतुल सुलाखे

satul68 @gmail. com


'**मरणात खरोखर** जग जगते' असे म्हणताना जीवनातील अंतिम आणि अटळ सत्य अभिप्रेत असते. या ओळीचा वेगळ्या दृष्टीने विचार केला, तर मरण हीच ज्यांची जीविका आहे अशा माणसांनाही ती लागू होते. खरेतर कोणीही असे जिणे स्वतःहून पत्करत नाही. तरीही आपल्या सामाजिक व्यवस्थेत असे अनेक समूह आहे. त्यातीलच एक समूह म्हणजे डोम अथवा डोंब.

डोंब, चांडाळ, राजा हरिश्चंद्राची दुःखद कहाणी अशी या समूहाची ओळख आहे. क्रूर, उग्र रूप. राहाणीही त्याला साजेशी. ही घसरण 'डोम' कावळ्यापर्यंत जाते. पक्ष्यांमधील कुरूप आणि अशुभ मानल्या जाणाऱ्या जिवाला या समूहाचे नाव दिले गेले, यावरूनच त्याचे सामाजिक स्थान स्पष्ट होते. खरेतर डोंब समाज कलांमध्ये निपुण. गायन-वादनात कुशल. तरीही आज तो अतिशूद्र म्हणून जगतो. त्याच्या जगण्याचा अभ्यासू आढावा घेणारे एक पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. 'फायर ऑन द गँजेस : लाइफ अमंग द डेड इन बनारस' हे राधिका अय्यंगार यांचे पुस्तक या समाजाच्या व्यथा शब्दबद्ध करते. राधिका यांचे हे पहिलेच पुस्तक असले तरी त्या पूर्वीपासूनच अभ्यासू पत्रकार म्हणून परिचित आहेत. पत्रकारिता करताना एकाच विषयात फार गुंतून राहता येत नाही आणि सतत विद्वत्तेचे प्रदर्शन केले तर योग्य तो परिणाम साधता येत नाही. मात्र अय्यंगार यांनी हा तोल नेटकेपणाने सांभाळला आहे. विद्वज्जडता बाजूला ठेवून अत्यंत सखोल व सोप्या भाषेत त्यांनी काशीमधील डोंब समाजाचे आयुष्य टिपले आहे.

चांद आणि मनिकर्णिका या घाटांवरील डोंब किंवा 'डोम' समाजाचे जगणे या पुस्तकात प्रतिबिंबित होते. स्मशान आणि डोंब असे काही कानावर आले की हरिश्चंद्राच्या गोष्टीपासून स्मशानातील भीतिदायक माणसांपर्यंतच्या अनेक गोष्टी आपल्या डोळ्यांसमोर येतात. वस्तुतः देशभर पसरलेल्या या समाजाची ओळख विविधांगी आहे. कलाकार, कुशल कारागीर, गुन्हेगार आणि अपवादाने शासक असा या समाजाचा भूतकाळ आहे. तथापि डोंब म्हणताच गंगेवरील घाटांचे चित्र डोळ्यांपुढे येते. अशी ओळख होण्याचे कारण, या समूहाचा भूत आणि मुख्यतः वर्तमानकाळ.

पुस्तकाच्या सुरुवातीला डॉली चौधरी यांचे कथन येते. या बाई पस्तिशीच्या घरातील विधवा. पदरात पाच मुले. नवरा सिकंदलाल चौधरी अकाली गेला. नातेवाईक पाठीशी नाहीत. एक दलित स्त्री, विधवा, शिक्षणाचे पाठबळ नाही आणि आर्थिक आघाडीवर दुबळी स्थिती, अशातच घर आणि संसाराची जबाबदारी एकटीच्या खांद्यावर. पुस्तकात पुढे दुःखाचे कोणते रूप दिसणार आहे, याचा अंदाज आरंभीच येतो. डॉलीच्या निमित्ताने सर्वहारा म्हणजे काय याची विषण्ण करणारी जाणीव होते. कोणत्याही आकडेवारीपेक्षा, पुस्तकांपेक्षा आणि तर्कशुद्ध विश्लेषणापेक्षाही अधिक परिणाम एकटी डॉली साधते. लेखिकेचा अभ्यास जिवंत करते.

नंतरच्या ३०-३५ प्रकरणांत वाराणसीच्या डोंब समाजाचे जगणे लेखिका आपल्यासमोर मांडते. या प्रवासात सुमारे ३५ लोक येतात. स्वतः डॉली, तिचा अकाली आणि संशयास्पद स्थितीत मरण पावलेला




**फायर ऑन द गँजेस : लाइफ अमंग द डेड इन बनारस**
लेखिका : **राधिका अय्यंगार**
पाने : **३४६**
प्रकाशन : **ॲन इम्प्रिंट ऑफ हार्परकॉलिन्स**
किंमत : **५९९ रुपये**

नवरा, डॉलीची मुलगी विधी, तिचे भाऊ, आई, सासू, शेजारी असे हे जग आहे. सारेच या व्यवस्थेत होरपळत आहेत. अपवाद फक्त भोलाचा आहे. त्याने एकट्यानेच महाविद्यालयीन शिक्षण घेतले आहे. या लोकांचे व्यवसाय मृतदेहांची विल्हेवाट लावणे किंवा त्याला पूरक आहेत. पुस्तकातील प्रत्येक व्यक्तिरेखा विविध प्रश्न घेऊन आपल्यासमोर उभी राहते. ही काही शोध पत्रकारिता नाही, हे लेखिकेने स्पष्टपणे नोंदवले असल्याने पुस्तकाचा परीघ निश्चित होतो. आपण उच्च वर्गात जन्माला आल्यामुळे या वर्गाच्या व्यथांच्या आकलनात येणाऱ्या मर्यादांचे भानही त्यांना आहे.

बनारसमधील चांद आणि मनिकर्णिका या दोन घाटांवरील चौधरी आणि यादव वस्त्यांमधील लोकांच्या जगण्याचा हा शोध आहे. डोंब समाजाचा इतिहास थोडक्यात सांगून झाल्यावर या समाजातील स्त्रियांच्या मर्यादाग्रस्त आयुष्याचे वर्णन करणारा भाग येतो. इथे डोंब समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात आली आहे. कलाकारांचा समावेश असलेला हा समाज अतिशूद्र कसा झाला याची नोंद गरजेची होती. महिला अनेक बंधनांनी ग्रासलेल्या तर पुरुष वर्ग तशाच परिस्थितीत जगणारा. अगदी लहान वयातच त्यांच्या समोर आयुष्याचे अंतिम सत्य भेसुर रूपात येते. आता हेच आपले आयुष्य हे त्यांना कदाचित समजत असेल तथापि पेलवत नाही. बनारसला 'महास्मशान' म्हणतात. ही 'विपरीत महता' हा डोंब समाज रोज पाहत, अवुभवत आहे.

जिथे मृतदेह शांत असतात, ते स्मशान असा स्मशान या शब्दचा अर्थ आहे, हे पुस्तक वाचताना जाणवते. या शांततेची किंमत कष्टी आणि हतबल समाजाकडून वसूल केली जाते. डोंब समूहाच्या जगण्याचा हा वेध कोणत्याही पूर्वग्रहांशिवाय पुस्तकात आला आहे. प्रत्येक दुःखाला, अनुभवाची जोड आहे. अनुभवाला अभ्यासाची जोड आहे आणि वाचकांना स्वयंनिर्णयाचे स्वातंत्र्य आहे. वर्तमानापासून जराही दूर जाता येणार नाही अशी पुस्तकाची मांडणी आहे. पुस्तकातील ग्रांथिक संदर्भ पाहता पुस्तक रिपोर्ताजच्यापलीकडे जाते.

डॉली आपले दुःख सांगताना म्हणते, या लग्नामुळे मी बर्बाद झाले. मला सांगा नवरा नसेल तर माझे अस्तित्व काय आहे? डॉलीचा शेजारी आकाश स्वतःचे दुःख सांगतो. सर्वहारा स्त्री आणि तसाच पुरुष असे दोघेही बोलतात तेव्हा त्या समूहाची खरी ओळख पटते. मळके कपडे, तुटक्या चपला आणि पायावर चितेचे चटके, आजवर आकाशाने असंख्य प्रकारचे मृतदेह पाहिले. त्यांना पाहून वाटणारी भीती, किळस, अशा भावनांना नेहमीच सामोरे जावे लागते. या भयावह स्थितीतून त्यांना केवळ व्यसनेच बाहेर काढू शकतात. या समाजातील पुरुष याच कारणांनी व्यसनांची वाट धरतात.

ही मुले साधारण दहाव्या- अकराव्या वर्षी कामाला लागतात. सुरुवातीला वडील मंडळींच्या हुकूमाखाली आणि चार- पाच वर्षांनी स्वतंत्रपणे. ही वाटचाल पाहता डोंब समाजातील मुले किती लवकर व्यसनांच्या कचाट्यात सापडत असतील, याचा अंदाज येतो. शरीर आणि मनाचे असे दुःख फार काळ झेपत नाही. या कामांचा मोबदला म्हणून पुरुषाला रोज ५० ते ६० रुपये मिळतात. वरची कमाई आणि स्मशानातील वस्तू यांचा विचार करता ही कमाई रोज शंभरच्या घरात जाते. काम कमीत कमी १२ तास.

आकाशपेक्षा लक्ष्य वेगळा आहे. त्याचे आणि आकाशचे पटत नाही. आकाश हा व्यवसाय सोडत नाही, पण लक्ष्य मात्र या कामाला पर्याय शोधतो आहे. हा लक्ष्य डॉलीचा भाऊ! लहानपणी तो घाटावर भुरट्या चोऱ्या करायचा. पुढे मात्र एका मल्लाहाने त्याला अन्य व्यवसायाची दिशा दाखवली. आकाश त्या मित्रासोबत नावाडी म्हणून काम करू लागला.

डॉली आणि विशालसोबतच, लक्ष्य, मोहन, भोला आदींच्या व्यथाकथनातून डोम समाजाची व्यथा अय्यंगार मांडतात. डोम समाजातील महिला, मुली, तरुण, लहान मुले, बालके, यांचे आयुष्य लेखिकेने तटस्थपणे मांडले आहे. परिणामी ही माणसे कशी दिसत असतील, याविषयीचे कुतूहल जागे होते.

करोना साथीचे या समाजावर झालेले परिणाम हादरवून टाकणारे आहेत. संपूर्ण देशात कडक टाळेबंदी असताना डोम समूहातील लोक मृतांच्या चिता पेटवत होते. तेही आरोग्यविषयक कोणतीही काळजी घेण्यासाठी आवश्यक सोयी-सुविधांचा अभाव असताना. ज्यांनी अशा स्थितीतही मानवतेच्या दृष्टिकोनातून काम केले, अशा माणसांना समाज म्हणून कशी वागणूक दिली जाते, याविषयी विचार करण्यास हे पुस्तक भाग पाडते. अस्वस्थ करते.

वाराणसी हा पंतप्रधान मोदी यांचा मतदारसंघ आहे, ही गोष्ट लक्षात घेतली तर गेल्या दहा वर्षांत या समाजाच्या आयुष्यात काही बदल झाला का, त्यांचे जीवनमान सुधारले का, या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न लेखिका करते. हे प्रश्न दोन प्रकरणांत हाताळले आहेत. एवढा अपवाद वगळता पुस्तकात समकालीन राजकारणावर अन्य कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही. शेजारच्या बिहारमध्ये डोंब समाज सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या मुख्य प्रवाहात येऊ पाहात आहे. भोलाराम तूफानी ते रामविलास, अशा नेत्यांनी डोंब समाजाच्या जागृतीसाठी कोणते प्रयत्न केले, याची नोंद पुस्तकात असणे अपेक्षित होते. पुस्तकात राजकारण आणले तर मुख्य मुद्दा बाजूला राहील आणि विषय भरकटेल या भीतीने राजकीय पक्ष आणि नेते यांना बाजूला ठेवले असावे, तथापि प्रत्येक समाजाला एक राजकीय भूमिका घ्यावीच लागते आणि विषमतेच्या उतरंडीत जसजसे तळाकडे जावे तशी ती अपरिहार्य ठरते. त्यादृष्टीने पुस्तकात काहीही भाष्य नाही.

शरणकुमार लिंबाळे यांच्या 'अक्करमाशी'चा संदर्भ यात येतो, पण महंमद खडस यांची 'नरकसफाईची गोष्ट' मात्र दिसत नाही. लेखिकेने जवळपास दशकभराचा काळ या विषयात गुंतविला आहे. यात अनुभव आणि अभ्यास यांचा समावेश आहे. 'केस स्टडीज'सदृश अराजकीय लिखाण वाचकांसमोर येते. ही सगळी नोंद, एका लेखिकेने, एक महिला केंद्रस्थानी ठेवून, केली आहे म्हणून याचे विशेष महत्त्व आहे. डोंब किंवा अशा अन्य समूहांना जाणून घेताना, हे पुस्तक महत्त्वाचे ठरेल, कारण हा संपूर्ण दस्तावेज अनाग्रही आहे. पुस्तकाची आवृत्ती आली तर डोंब समाजाची राजकीय आणि सामाजिक जडणघडण लेखिकेने आवर्जून मांडावी. पुस्तक आणखी नेमके आणि व्यापक होईल.

Scanned with OKEN Scanner